अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# हे कसले खासदार?... हा तर स्वार्थाचा बाजार

आपल्या देशातल्या राजकारण्यांनी कितीही सरकारी सुविधा मिळाल्या तरी त्या हव्याच असतात. एकाही राजकीय पक्षाचा एकही नेता असा प्रामाणिकपणा दाखवत नाही की, मी लोकप्रतिनिधी आहे आणि मी कमीत कमी सरकारी सुविधा घेईन आणि जास्तीत जास्त जनतेची सेवा करीन. असे सांगणारा एकही जनसेवक दिसत नाही. प्रत्येकजण सरकारी तिजोरीवर तुटून पडलेला आहे. कोणत्या मार्गाने आणि कशा कशा पध्दतीने आपल्याला सरकारी योजनांचा आणि यंत्रणांचा फायदा उठवता येईल, एवढेच त्यांच्या डोक्यात असते. ज्या गोष्टी मिळत नसतील त्या मागून पदरात पाडून घेण्याचा हावरटपणा ते करतात. यावरून आपल्या देशातले लोकप्रतिनिधी हे लोकांपेक्षाही स्वत:चे हित पाहणारे स्वार्थी प्रतिनिधी आहेत. आज देशातल्या प्रत्येक खासदाराला, आमदाराला भरमसाठ सोयीसुविधा मिळतात. निवडून आल्यानंतर तर त्यांची जणूकाही लॉटरीच फुटते. दाही दिशांनी पैशांचा आणि सोयी–सुविधांचा ओघ त्यांच्या तिजोरीकडे वळतो अशी आज परिस्थिती आहे. त्यामध्ये कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी ते किती जागरूक असतात, हे त्यांच्या चाणाक्षपणावरून दिसून येते. गेल्याच आठवड्यात नागरी हवाई खात्याने एक आदेश खाजगी विमान कंपन्यांवर बजावला. त्यात सर्व कंपन्यांना शाही वागणूक देण्याचे फर्मान सोडले गेले. अगदी विमानतळावर त्यांचे स्वागत करण्यापासून ते विमानात बसल्यानंतर सर्व प्रकारच्या सोयी फुकट देण्यापर्यंत सूचना त्यात दिल्या गेल्या. साध्या लोकप्रतिनिधीला अशा प्रकारची शाही वागणूक देण्याचे फर्मान सोडले जाते. याचाच अर्थ लोकशाहीच्या नावाखाली स्वत:ची राजेशाही उपभोगण्याची या लोकांची इच्छा आहे हे स्पष्ट दिसते. सरकारी विमान कंपनी जणूकाही यांची नोकर असल्यासारखी सरबराई करते. इंडियन एअर लाईन्स आणि एअर इंडियाच्या सगळ्या विमानांमधून त्यांना अक्षरश: राजेशाही थाटाची वागणूक मिळते. या अतिमहत्त्वाच्या व्यक्ती आहेत असे सरकारचे म्हणणे आहे. आता या महत्त्वाच्या आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्ती या प्रकाराविरुध्दच जनतेमध्ये संताप व्यक्त झाला असतानाच, सरकार जर त्याचा आग्रह धरत असेल तर मात्र अतिमहत्त्वाच्या या अतिरेकाला अंतिम गती देण्याची वेळ आली आहे. खासदार आहेत म्हणून त्यांना खास वागणूक दिली जावी, हा प्रकारच फार मोठा सामान्य जनतेवर अन्याय करणारा आहे आणि समानतेचे तत्त्व गुंडाळून ठेवणारा ठरतो.

## घटनात्मक तत्त्वांचीच पायमल्ली

या देशाची घटना तयार करताना लोकप्रतिनिधींना जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी काही विशेष हक्क दिले गेले आणि त्याबरोबरच त्यांच्या जबाबदाऱ्यांचे भानही करून दिले गेले. दुर्दैवाने घटनेच्या या अधिकारांचा गैरअर्थ लावला गेला. लोकप्रतिनिधी म्हणून मिरवताना आपल्याला काही कामे करावी लागतात, जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात, असा टेंभा मिरवत फक्त हक्कांवरच या लोकप्रतिनिधींनी लक्ष केंद्रित केले. त्यातला सर्वात धक्कादायक भाग म्हणजे त्यांना दिले गेलेले हे हक्क जनतेच्या कामांसाठी वापरण्याऐवजी स्वत:च्या कुटुंबासाठीच जास्त वापरले गेले. आजदेखील रेल्वे प्रवास, विमान प्रवास यामध्ये वर्षातून एकवेळा कुटुंबाला नेण्याची व्यवस्था आहे. सोबत नोकर–चाकर नेण्याची सुविधा दिलेली आहे. खासदारांना दिल्लीमध्ये बंगला, एक्झिक्युटीव्ह क्लासचा फुकट विमान प्रवास, शिवाय दर महिन्याला किमान एक लाख रुपयांचे मानधन यांच्या खिशामध्ये पडत असते. अशा सगळ्या सरकारी सोयी–सुविधांनी मालामाल असलेल्यांना लोकप्रतिनिधी तरी कसे म्हणायचे? असा प्रश्न निर्माण होतो. जिथे जाऊ तिथे मनाप्रमाणे खाऊ आणि आम्ही म्हणू तेच धोरण राबवू, अशा प्रकारची एक मनमानी प्रवृत्ती वाढीला लागलेली आहे. अशांना खासदार न म्हणता त्यांना स्वार्थाचे आगारच म्हणायला हवे. एकीकडे आपल्याच सरकारची विमान कंपनी डबघाईला आलेली आहे. तिच्या कामकाजाविषयी संसदेमध्ये आरडाओरडा करायचा आणि दुसरीकडे याच तोट्यात चालणाऱ्या विमान कंपनीकडून फुकट प्रवासाचे फौजदार म्हणून मिरवायचे. आहे ती न चालणारी कंपनीही लवकरात लवकर कशी बुडेल अशाच प्रकारची बेफिकिरी या खासदारांकडून दाखवली जाते. त्यावेळेला लोकशाहीच्या नावाने चालणारा हा स्वार्थाचा बाजार सामान्य माणसावर किती अन्याय करणारा आहे हे ठसठशीतपणे दिसून येते. प्रश्न असा निर्माण होतो की, प्रत्येक ठिकाणी अशा सुविधा मिळण्याचा आग्रह ही मंडळी का धरतात. सामान्य माणसासारखे जीवन हे जगूच शकत नाहीत का? मंत्री असला म्हणजे त्याला लाल दिव्याची गाडी कशाला हवी. हल्ली तर आमदार, नगरसेवकसुध्दा स्वत:च्या गाड्यावर आपण आमदार किंवा नगरसेवक असे ठिगळ चिटकवून आपल्या फाटक्या बुध्दीचे प्रदर्शन करतात. गल्ली बोळातले राजकीय पक्षसुध्दा आपापल्या गाड्यांवर आपल्या पक्षाचे झेंडे फडकवून रुबाब दाखवण्याचा प्रयत्न करतात. राजकारणात घुसलेला हा मुजोरीपणाच आज लोकांना नकोसा झाला आहे. या संतापाच्या प्रतिक्रियेतूनच आम आदमीसारख्या पक्षाला लोक मतदान करीत आहेत.

## पिढ्यान्‌पिढ्या चालणाऱ्या राजकीय पेढ्या

आम्ही तर यापूर्वी अनेक वेळा असे म्हटले आहे की, लोकप्रतिनिधींना किंवा नोकरशहांना सरकारी कामकाजाच्या वेळीच सुविधा दिल्या गेल्या पाहिजेत. सलग पाच वर्षांसाठी गाड्या–घोड्यांचा आणि फुकट प्रवासाचा भुर्दंड सरकारने सोसायची काहीच गरज नाही. आज अनेक सनदी अधिकारीसुध्दा सरकारी तिजोरीची लूट करीत असतात. आपल्या आपल्या कुटुंब–काफिल्यांना घेऊन सरकारी पैशावर गाड्या उडवित असतात. या सगळ्या सोयीसुविधा कायद्याच्या किंवा सरकारी नियमात बसवून सरकारी तिजोरीला चुना लावत असतात. लोकशाहीचे खरे तत्त्व हे समानतेमध्ये दडलेले आहे. कायद्यापुढे जर समान असतील तर त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. ती होत नसल्यामुळेच या लोकशाहीच्या छत्राखाली राजकारणाचा धंदा झाला आणि स्वातंत्र्य मिळाल्यापासून पिढ्यान्‌पिढ्या राजकारण्यांच्या सराफी पेढ्यांप्रमाणे राजकीय पेढ्या निर्माण झाल्या. या सरकारी सुविधा पन्नास टक्क्याने कमी झाल्या आणि एकेका व्यक्तीला फक्त कोणतीही निवडणूक फक्त दोनदाच लढवण्याचे बंधन घातले तर सरकारी तिजोरीची लूट ताबडतोब थांबेल. सगळे राजकारणी सुतासारखे सरळ होतील.